# सोन्यासारखी माणसे मिळणे दुर्मिळ

## 'पुणेरत्न पुरस्कार' सोहळ्यात दाजीकाका गाडगीळ यांचे मत

**पुणे, ता. १० :** "आजच्या समाजात सोन्यासारखी माणसे मिळणे दुर्मिळ झाले आहे," असे मत ज्येष्ठ सराफ व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ यांनी मंगळवारी व्यक्त केले.

अभियान प्रतिष्ठानतर्फे दाजीकाकांना ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते पुणेरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. वरिष्ठ पोलिस निरीक्षक भानुप्रताप बर्गे, दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचे अध्यक्ष अशोक गोडसे, बुकगंगा डॉट कॉमचे मंदार जोगळेकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश पवार उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यावर मनोगत व्यक्त करताना दाजीकाका म्हणाले, "दुकानांतील रत्नांपेक्षा 'पुणेरत्न पुरस्कार' मला अधिक मोलाचा वाटतो. व्यापार करताना समाजात मिसळता आले, अनेकांची सुख-दुःखे वाटून घेता आली, याचा आनंद वाटतो. आजकाल सर्व काही मिळते; मात्र सोन्यासारखी माणसे मिळणे दुर्मिळ झाले आहे."

नितीन गुजराती, राजाभाऊ चव्हाण यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. मुकुंद गाडगीळ यांच्या मराठी जोडीदार डॉट कॉम या संकेतस्थळाचे उद्‌घाटन दाजीकाकांच्या हस्ते झाले.



उद्यानप्रसाद कार्यालय, सदाशिव पेठ : **अभियान प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ सराफ व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ यांना मंगळवारी पुणेरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. या प्रसंगी (डावीकडून) मंदार जोगळेकर, भाई वैद्य, दाजीकाका, अशोक गोडसे आणि बर्गे.**